# छत्रपती शिवाजी महाराज : प्रशासन विषयक धोरण




सपांदक

डॉ.अशोक काकासाहेब जाधव

डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी

छत्रपती शिवाजी महाराज : प्रशासन विषयक धोरण

■ प्रथम आवृत्ती – १९, फेब्रुवारी २२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN**- 978-93-91305-05-5

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# संपादकीय

' छत्रपती शिवाजी महाराज : प्रशासन विषयक धोरण ' या विषयावरील ग्रंथाचे संपादन करताना आम्हास मनस्वी आनंद होत आहे. 'शिवकालीन प्रशासन' या विषयावर लोकप्रशासन अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस प्राचार्य इस्माईल पठाण कोल्हापूर यांचे आम्हास मौल्यवान मार्गदर्शन लाभले. शिवकालीन अष्टप्रधानमंडळ व प्रशासन यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ.राजेश करपे (इतिहास विभाग प्रमुख, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण जि. औरंगाबाद, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी 'शिवकालीन न्यायव्यवस्था' याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. तसेच डॉ.दीपक सूर्यवंशी (सहकार भूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड ता. शिरोळ जि.कोल्हापूर) यांनी 'शिवकालीन महसूल' व्यवस्थेवर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. या तिन्ही अभ्यासकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनाविषयी जे मार्गदर्शन केले. त्यामुळे आम्हास ' छत्रपती शिवाजी महाराज : प्रशासन विषक धोरण ' हा ग्रंथ संपादित करण्याची प्रेरणा मिळाली.

आदरणीय डॉ. उद्धव भोसले (कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ) डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन (प्र. कुलगुरू स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड) डॉ. पंचशील एकंबेकर (अधिष्ठाता मानव्यविद्या शाखा स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड) प्रो. जितेंद्र वासनिक (लोक प्रशासन विभाग प्रमुख राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पु. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | रयतेचा राजा राजा शिवाजी | डॉ.काळे बी.एम | 1 |
| 2 | शिवकाळातील लष्करी प्रशासन | प्राचार्य डॉ.अजय बी.पाटील | 6 |
| 3 | शेतकऱ्यांचे कैवारी - छत्रपती शिवाजी महाराज | डॉ.बळवंत विष्णू घोगरे | 15 |
| 4 | शिवकालीन प्रशासन :-एक दृष्टीक्षेप | डॉ. बी.आर.कतुरवार | 22 |
| 5 | छत्रपती शिवरायांचा स्त्रिविषयक दृष्टिकोन | डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे | 28 |
| 6 | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती | वसुदेव प्रभु मुळीक | 37 |
| 7 | छ. शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था | डॉ. राम फुन्ने | 46 |
| 8 | शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था आणि अष्टप्रधान मंडळ | डॉ. सुधाकर नारायण भालेराव | 52 |
| 9 | छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन आणि त्यांच्या प्रशासनाची वैशिष्ट्ये | डॉ बंजारा दिलीप लालू | 59 |
| 10 | शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टीकोण | डॉ. ममता फुके | 66 |
| 11 | शिवकालीन इतिहास लेखनातील प्रवाह- एक ओळख | प्रा. नाजीर पठाण | 71 |
| 12 | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ | प्रा. सुधाकर एस. हांगे | 77 |
| 13 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ | डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव | 82 |
| 14 | छत्रपती शिवाजी महाराज | डॉ. प्रांजू आर. हिरेखन | 88 |
| 15 | स्त्री सन्मानाचे पुरस्कर्ते छ. शिवराय | प्रा. पंकजा कमलेश आहिरे | 97 |
| 16 | शिवछत्रपतीचे व्यापार विषयक धोरण | प्रा डॉ.आंबादास पांडुरंग बर्वे | 108 |
| 17 | शिवकालीन चलन व्यवस्था एक अभ्यास. | प्रा.डॉ.शिंदे बी.आर | 111 |
| 18 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ | प्रा. डॉ. विठ्ठल पंडितराव सांडूर | 117 |
| 19 | छत्रपती शिवाजी महाराज यांचे आरमार धोरण | डॉ. भुजंग पाटील | 121 |
| 20 | छत्रपती शिवाजी महाराजांचे सामाजिक धोरण | डॉ. बाळासाहेब आनंदराव निर्मळ | 128 |
| 21 | छत्रपती शिवाजी महाराजांचे मुस्लिम सैनिक | प्रा.डॉ.सय्यद मुजीब मुसा | 133 |
| 22 | शिवकालीन बागलाणचा ऐतिहासिक अभ्यास | प्रा. संदीप भामरे | 137 |

# छत्रपती शिवरायांचा स्त्रिविषयक दृष्टिकोन

डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे
कै रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जिल्हा- परभणी.
Mob. ८९८३७७६०७७ ,tengsesunita1@gmail.com

**प्रस्तावना**

जगाच्या इतिहासात शेकडो-हजारो राज्य उदयास आले आणि त्यांचा अस्त ही झाला. भारताचा इतिहास ही त्याला अपवाद नाही. आज फार कमी अशी राजसत्ता आहेत कि ज्यांची दखल जगाला आणि आजच्या पिढीला घ्यावी लागत आहे. अशा काही मोजक्या पण महत्त्वाच्या राज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांनी सतराव्या शतकात स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य आहे. भारताच्या इतिहासाचे परिशीलन करताना मराठ्यांच्या राजवटीची दखल घेतल्याशिवाय ते पूर्ण होणार नाही. सतराव्या शतकात मराठ्यांची सत्ता हिंदवी स्वराज्याच्या रुपाने उदयास आली. याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली असली तरीही त्याला तीन दशकांची पार्श्वभूमी होती. हिंदवी स्वराज्य म्हणजे मराठी सत्तेचा पाया होय. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेपूर्वी महाराष्ट्रात सामाजिक चळवळी चालू होत्या आणि या सामाजिक आणि राजकीय चळवळीचा संगम होऊन स्वराज्याची स्थापना करण्यात आली. स्वराज्य स्थापना म्हणजे दक्षिणेतील क्रांतीच होय, ही क्रांती आदिलशहाला, मोगलांना, औरंगजेबाला नष्ट करता आली नाही. हि क्रांती महाराष्ट्रातील लोकांनी त्यांच्या राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली घडवून आणली. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील प्रत्येकाचे स्फूर्तीदायी दैवत आहे. कुशल नेतृत्व, कर्तुत्व, संघटन, सावधानता हे गुण महाराजांच्या अंगी होते. प्रजाहितदक्ष, एक प्रखर योद्धा, कुशल राज्यकर्ता, उदार व लोककल्याणकारी राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगाला प्रेरणादायी आहे.





**शोधनिबंधाचा उद्देश**

१)छत्रपती शिवरायांच्या जडणघडणीत जिजाऊंचे योगदान अभ्यासणे.

२) छत्रपती शिवाजी महाराजांचे महिला संदर्भातील विचार आणि कार्य जाणून घेणे.

प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी दुय्यम तथ्य संकलन सामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे, त्यात प्रामुख्याने संदर्भ पुस्तके, वृत्तपत्रे, मासीके व इंटरनेटवरील माहितीच्या साह्याने शोधनिबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे.

**छत्रपती शिवरायांना घडवणाऱ्या मातोश्री जिजाऊ**

शिवचरित्रावर जेव्हा आपण विचारमंथन करतो तेव्हा शहाजीराजांचे स्थान आदराचे आहे तर राजमाता जिजाबाईंचे स्थान आदरयुक्त श्रद्धेचे आहे. इतिहासात जिजाबाईं सारखे भाग्य फार कमी स्त्रियांच्या वाट्याला आले आहे. वीर कन्या, वीरपत्नी व वीरमाता अशा अनेक भूमिका पार पाडण्याचे सौभाग्य नियतीने त्यांना बहाल केले होते, पण त्याची जबाबदारी पार पाडत असताना अनेक जहरी प्रसंगांचा त्यांनी आयुष्यात सामना केला. दक्षिणेतील सुलतान आणि राजकारणाचे जीवघेणे चटके त्यांना सोसावे लागले होते. भर दरबारात निजामशहा मुजरा करावयास गेलेल्या लखुजी राजांना आपल्या मुला नातवांसह कापून काढल्याच्या वार्तेने त्यांचे मन हुरळून गेले होते आणि कर्नाटकातील राज्य आपल्या पतीने पराक्रमाने वाढविले त्याच शाहीने त्यांच्या हातात बेड्या ठोकल्या. या घटनेने त्यांच्या मनातील सुलतानी राजवटी विषयीचा तिरस्कार पराकोटीस पोहोचला होता. जिजाबाईंवर कोसळलेल्या संकटांना केवळ वैयक्तिक दुःखाचा अथवा अपमानाचा आशय नव्हता तर ती संकटे समाजाच्या एकूण राजकीय गुलामगिरीचे निदर्शक होते. असे म्हटले जाते की मुलावर पहिला संस्कार माता करत असते. बाल शिवबांवर जिजाबाई सारख्या असामान्य मातेने कोणता संस्कार केला असावा यासाठी अभ्यासकांनी खास तर्कबुद्धीची गरज नाही. आपल्या मुलाने स्वतःसाठी फक्त तख्त निर्माण करावे, स्वतःवर छत्र धारण करावे आणि आपल्या लोकांची, मराठ्यांची शाही स्थापन करावी अशी महत्वकांक्षा या क्षत्रिय स्त्रीने धरली होती आणि सुदैवाने त्यांचा पुत्रही असामान्य कर्तबगारीचा निघाला की मातेचा प्रत्येक

संस्कार गृहण करून तिचे महत्त्वकांक्षी स्वप्न त्यांनी साकार केले. जिजाबाईंना याची देही याची डोळा आपला पुत्र तख्तावर बसलेला, क्षेत्र धारण केलेला मराठ्यांचा छत्रपती, पातशहा बनलेला पाहण्याचे भाग्य लाभले. जयराम पिंडयेने जिजाऊं बाबत कवन लिहिले होते त्या कवणाचा भावार्थ सांगतांना इतिहासाचार्य राजवाड्यांनी असे म्हटले आहे की 'जिजाई शहाजी सारख्या धीरोदात्त व पराक्रमी पुरुषाला चांगलीच सजन्या सारखी बायको होती आणि ती केवळ नवऱ्याच्या किर्तीवर नव्हे तर स्वतःच्या धीर,उदार व गंभीर वृत्तीने तिची कीर्ती त्या काळी सर्व भरतखंडभर पसरली होती, म्हणजेच तिच्या कीर्तीच्या घुमटाखाली म्हणजे सर्व जंबुद्वीपातील सज्जन लोक यवनांच्या जुलमाला कंटाळून आश्रयार्थ येत असत, असे जयराम लिहितो'. जिजाबाई या कोणत्या तोलाच्या होत्या याचा अनुभव जयरामाच्या तत्समकालिन उक्तीवरून करता येतो.

स्वराज्यातील सर्व कार्य शिवाजी महाराजांनी आपल्या मातेच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने केलेले आहेत. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावर छापा, आग्राभेट यासारख्या धोकेबाज साहस प्रसंगी खात्रीने त्यांनी आपल्या मातीशी सल्लामसलत केली असावी. अशा प्रसंगी आपल्यामागे आपल्या राज्याचा कारभार आपल्या मातेवर सोपवून महाराज जात असत. बाल शिवाजीसह सदरेवर बसून ज्यांनी पुणे जहागिरीवर कारभार केला होता त्यांना हिंदवी स्वराज्याचा कारभार करणे अवघड नव्हते, पण जिजावाईच्या प्रशासन कौशल्याची खरोखर कसोटी लागली ती शिवाजी महाराज मोगलांच्या कैदेत अडकल्यावर, महाराजांच्या अनुपस्थितीत त्यांनी स्वराज्याचा कारभार चोख केला. त्यांच्या या अल्पशा कारकीर्दीत एकही फंदफितुरी स्वराज्यात घडून आली नाही.

जिजाई- शिवाजी या मायलेकरांच्या जीवनात अनेक नाट्यमय वर्धन हृदयस्पर्शि प्रसंग आले. विश्वास घातकी औरंगजेबाच्या भेटीस आपला पुत्र पाठविला असता त्याने त्यास तेथे कैदेत घातल्याची वार्ता दक्षिणेत येऊन धडकली असता आणि त्या कैदेतून सुटून अचानक पणे तो राजगडावर आपल्यासमोर उभा राहिला असता जिजावाईच्या अंत:करणात कोणत्या भावनांची गर्दी झाली असेल हे मात्र मातेचे





हृदयच समजू शकते. जिजाबाईंनी अशा अनेक प्रसंगाचे हलाहल पचविले होते आणी त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाची जे रसायन तयार झाले त्यामुळे कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची असामान्य धैर्य त्यांच्या मनाच्या ठिकाणी निर्माण झाली होते आणि हाच संस्कार शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत रूजला होता.

**छत्रपती शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टिकोन**

छत्रपति शिवरायांनी स्त्रियांकडे नेहमी आदराने पाहिले, स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या विषयी त्यांच्या मनात चीड होती. त्यांच्या मनाची हि जडणघडण करण्यात जिजावाईंची भूमिका महत्त्वाची होती. जिजाबाईने जे संस्कार केले त्यामुळे स्त्रीचा आदर आपण केला पाहिजे ही त्यांची मनोभूमिका तयार झाली होती. त्यांनी घेतलेले पुढील निर्णय स्त्रीबाबतची भूमिका स्पष्ट करतात.

रांझे गावच्या बालाजी गुजर या नावाच्या पाटलांनी एका शेतकऱ्याच्या मुलीशी बदकर्म केले, तेव्हा त्या मुलीने आत्महत्या केली. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून शिवाजींनी बाबाजी गुजर यांची पाटीलकी रद्द केली. तीनशे होणांचा दंड केला व त्यांचा एक हात व एक पाय तोडण्याची शिक्षा दिली नंतर बाबाजी गुजरच्या भावाने विनंती केली म्हणून त्यांनी त्यास पाटीलकी दिली.

मुसे खोऱ्यातील मुरंजे येथील त्रिमल वाकडे कुलकर्णी यांच्याकडे लग्नाचे वराड आले होते तेव्हा त्यातील एका हवाई नावाच्या महिलेशी रंगो त्रिमल याने बदवर्तन केले. हे शिवाजीराजांना कळले. त्रिमल शिक्षेच्या भीतीने चंद्रराव मोरे यांच्या आश्रयाला गेला. तेव्हा रंगो त्रीमला शिक्षा करणे व गुन्हेगारास आश्रय देणाऱ्या चंद्रराव मोरे याला जाब विचारण्यासाठी त्यांच्याविरुद्ध मोहीम काढली.

सुरत लुटले पण त्या लुटीच्या वेळेस त्यांना कोणताही त्रास होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली.

इ.स. 1664 मध्ये शहाजीराजांच्या मृत्यूनंतर जिजाबाई सती जाण्यासाठी निघाल्या तेव्हा शिवाजींनी आईचे मन वळविले व तिला सती जाण्यापासून रोखले.

कर्नाटक प्रांतातील बेलवाडीच्या गडीत शिवरायांचे काही बैल देसाई यांनी पकडून ठेवले होते. शिवरायांच्या आदेशानुसार सरदार सखोजी गायकवाड यांनी गडीवर

हल्ला चढविला. किल्लेदार देसाई मारला गेला, त्याच्या विधवा पत्नीने 27 दिवस गडी लढविली, शेवटी तिचा पराभव झाला. सखुजी गायकवाडणे देसाईची विधवा पत्नी सावित्रीबाई हीच्याशी चिडून जाऊन वदकर्म केले. ही वार्ता शिवरायांना कळताच ते भयंकर चिडले, शिवरायांनी गायकवाड यांचे डोळे काढले व पन्हाळ्यावर कैदेत टाकण्याची शिक्षा दिली.

5 एप्रिल 1663 मध्ये शिवाजींनी पुण्यातील लाल महालावर छापा टाकला. तेव्हा त्यांनी खानाच्या जनानखान्यातील स्त्रियांची कोणाकडूनही विटंबना होणार नाही याची काळजी घेतली होती.

युद्ध मोहिमेवर जाताना बायको, कलावंतीण कुणबीनि आपल्या सोबत आणू नयेत अशी त्यांची सक्त ताकीद होती. शिवकाळात या नियमांचे कडक पालन झाले.

संभाजीच्या जन्मानंतर त्याची आई सईबाई आजारी पडल्या, तिचे दूध कमी झाले तेव्हा नरसापुर जवळील कापूरहोळ गावच्या तुकोजी गाडी पाटील यांच्या पत्नी धाराबी या संभाजीच्या दूधआई झाल्या आणि त्याबद्दल धाराऊंन्ना 26 होणांची जहागिरी व तिच्या दोन्ही मुलांना नोकरी त्यांनी दिली.

कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला त्यांनी दिलेली वागणूक ही घटना त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोन स्पष्ट करतो. पण हा प्रसंग खरा की खोटा बद्दलही इतिहासकारात मतभेद आहेत. त्यांनी आठ विवाह केले पण त्यामागे स्वराज्य बांधणीसाठी विविध सरदार घराण्याचा उपयोग व्हावा हा हेतू होता.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील प्रत्येकाचे स्फूर्तीदायी दैवत आहेत, कुशल नेतृत्व, कर्तुत्व, संघटन, सावधानता हे गुण महाराजांच्या अंगी होते. महाराजांचे कार्य दैदिप्यमान आहे. त्यांनी अन्यायाविरूद्ध आवाज उठवून स्वकियांमध्ये आत्मसन्मान जागविला. अद्वितीय योद्धा म्हणून महाराज जगभर परिचित आहेत. त्यांनी गनिमी काव्याचा प्रभावी उपयोग केला. देशात सर्वप्रथम नौसेनेची स्थापना केली, अनेक गड किल्ले उभारले. जातपात, धर्म यापेक्षा त्यांनी आपल्या राज्यकारभारात कतृत्वाला महत्व दिले. त्यांच्या राज्यात





महिलांना सन्मानाची वागणूक दिली जात असे. सर्वांना एकत्र घेऊन त्यांनी बलाढ्य शत्रूचा सामना केला. अफजलखानाची फटफजिती करून यमसदनास पाठविले. आपल्या मावळ्यांच्या जीवाच्या बळावर त्यांनी अटक ते कटकपर्यंत राज्याचा विस्तार केला. अशा थोर छत्रपती विषयी शिवचरित्र अभ्यासक डॉ. बाळकृष्ण हे डच, पोर्तुगीज, ब्रिटिश साधनांच्या आधाराने शिवरायांबाबत सांगतात, "शिवाजीराजांची नजर अत्यंत तीक्ष्ण होती. ते नेहमी स्मितहास्य करून बोलत. ते अत्यंत बुद्धिमान होते. ते नेहमी चैतन्यशील असत. कामात जलद आणि उत्साही असत. त्यांची चाल उत्साही असे. त्यांच्या राहणीमानात डामडौल नव्हता. ते विलासी जीवनापासून दूर होते. त्यांच्या छावणीत नर्तकी, मद्यालये आणि अमली पदार्थांवर कडक निर्बंध होते." डॉ. बाळकृष्ण पुढे म्हणतात, "शिवाजी महाराजांच्या राज्यात व परराज्यांतील मोहिमांमध्ये स्त्रियांना नेहमीच आदराने वागवले जाई. स्त्रियांना कैद करायला बंदी होती. त्यांना अत्यंत सन्मानाने वागवले जात असे." छत्रपती शिवाजी राजांचा दंडक होता, की स्वराज्यातील व परराज्यांतील स्त्रियांचा आदर केला पाहिजे. शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील व शत्रूंच्या स्त्रियांना देखील नेहमीच मानाने वागविले. मोगली फौजेतील रायबाघीण शिवरायांच्या विरोधात उमरखिंडीत लढली, त्यात तिचा पराभव झाला. ती पकडली गेली, तेव्हा शिवाजीराजांनी तिला तिच्या हुद्यानुसार सन्मानाची वागणूक दिली. तिचा आदर-सत्कार करून तिला तिच्या छावणीत सुखरूप पोचविले. दक्षिण दिग्विजयावरून स्वराज्यात परतत असताना कर्नाटकातील बेलवाडीच्या किल्लेदार सावित्रीबाई देसाई या शिवाजी महाराजांच्या विरुद्ध लढल्या. त्यावेळी सावित्रीबाईंचा अवमान करणाऱ्या स्वकीय सरदारांना शिवरायांनी शिक्षा केली. सावित्रीबाई देसाई यांचा सन्मान केला. त्यांच्या लहान बाळाला मांडीवर बसवून दूध पाजल्याचे शिल्प आज देखील यादवाडला पाहावयास मिळते.

राजकीय संघर्षात महिलांचा अनादर होणार नाही, याची दक्षता शिवाजी महाराजांनी घेतली होती. शिवाजी महाराजांनी पनवेलजवळचा प्रबळगड जिंकला, त्या लढाईत तेथील किल्लेदार केसरीसिंह धारातीर्थी पडला. त्याची आई, पत्नी आणि

मुले यांना मावळ्यांनी शिवरायांसमोर हजर केले. तेव्हा शिवरायांनी त्यांना अभय दिले. केसरीसिंहाच्या आईचा व पत्नीचा सन्मान करून त्यांना पालखीत बसवून त्यांच्या देऊळगाव या मूळ गावी सुखरूप पाठविले. आपल्या राजकीय विरोधकांच्या आईचा, पत्नीचा, मुलांचा, वहिणीचा आदर, सन्मान आणि संरक्षण करण्याचे शिवरायांचे धोरण होते. त्या धोरणाची त्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी केली.

मोगल इतिहासकार खाफीखान लिहितो, "जसा भाऊ बहिणीशी वागतो किंवा मुलगा आईशी वागतो, तसे शिवाजी महाराज स्त्रियांशी वागायचे." शिवरायांनी नेहमीच धर्मग्रंथ, धार्मिक स्थळे, स्त्रिया आणि लहान मुलांचा सन्मान केला. आपल्या शत्रू पक्षाच्याही महिलांचा सन्मान करावा, ही उच्च कोटीची नैतिकता आहे. शिवाजीराजांच्या ठायी अशी नैतिकता होती. त्यामुळेच त्यांनी स्वराज्यातील व परराज्यांतील महिलांचे संरक्षण केले. महिलांवर अन्याय करणाऱ्या बाबाजी गुजरला त्यांनी कठोर शिक्षा केली, हे त्याचे एक उदाहरण. छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या त्यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊंचा प्रत्येक शब्द त्यांनी शिरसावंद्य मानला. १६४२ ते १६७४ पर्यंतच्या महत्त्वाच्या घटनाप्रसंगी जिजाऊसाहेब शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. तोरणा किल्ला जिंकणे, अफजलखानाचा वध, आग्रा येथून सुटका, पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका, राज्याभिषेक इत्यादी प्रसंगी शिवाजीराजांनी जिजाऊसाहेबांचा सल्ला घेतला. स्त्रीसुद्धा बुद्धिमान आहे, हिंमतवान आहे, कर्तृत्वान आहे, यावर शिवरायांचा दृढ विश्वास होता. जिजाऊसाहेबांच्या सक्रिय सहभागातून हे स्पष्ट होते, की शिवकाळातील निर्णयप्रक्रियेत महिलांना सहभागी करून घेतले जात असे.

शिवाजीराजांच्या महिलाविषयक धोरणामुळेच नंतरच्या काळात संभाजी महाराजांच्या महाराणी येसूबाई, राजाराम महाराजांच्या महाराणी ताराराणी या स्वराज्याच्या रक्षणासाठी निर्भीडपणे पुढे आल्या. शिवरायांच्या सुनांनी हातात तलवार घेऊन घोड्यावर बसून रणांगण गाजविले, सिंहासनावर बसून राज्यकारभार केला. शिवाजीराजांच्या महिलाविषयक धोरणामुळेच हे शक्य झाले. महिलांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांची शिवरायांनी कधीच गय केली नाही. महिलांनाही





जगण्याचा, सुरक्षित राहण्याचा, व्यक्त होण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय करणारा स्वकीय असला तरी शिवरायांनी त्याला कठोर शिक्षा दिली. पोटी मुलगाच जन्माला यावा, अशी अपेक्षा बाळगणारे अनेक लोक आजही आहेत. वंशाला दिवा मुलगाच असतो, असे समजणारेही लोक आहेत. महिलांचा अनादर करणारे लोक आजही आहेत अशा अनिष्ट परंपरा नष्ट करण्यासाठी शिवाजी महाराजांच्या महिलांबाबतच्या धोरणाची आजही गरज आहे. आपल्या राजकीय, धार्मिक विरोधकांच्या महिलांचादेखील आदर, सन्मान, संरक्षण करणे हेच खरे शिवकार्य आहे. मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांना संधी देणे हे शिवकार्य आहे. राजकीय लढा चालूच राहील; पण त्या राजकीय लढ्यातदेखील विरोधी बाजूच्या महिलांचा सन्मान करणे, ही खरी शिवभक्ती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात अनेक जीवघेणे प्रसंग आले. पण त्यांनी नैतिकता कधीही सोडली नाही. औरंगजेब, दिलेरखान, शाहिस्तेखान, अफजलखानाबरोबर संघर्ष केला. पण त्यांच्याही महिलांचा शिवाजीराजांनी आदर केला. महिलांचा आदर करण्याची प्रेरणा शिवचरित्र नेहमीच देत राहील.

**सारांश**

छत्रपती शिवाजी महाराज शूर, बुद्धिमान, मुत्सद्दी, लोककल्याणकारी आणि नीतिमान राजे होते. त्यांचा इतिहास जसा शौर्याचा, धैर्याचा आहे, तसाच औदार्याचादेखील आहे. त्यांनी तलवार चालवली, रणांगण गाजविले, त्याचबरोबर आदर्श शासनप्रणालीचा अवलंब केला. त्यांचे राज्य केवळ एका जातिधर्माचे नव्हते, तर गोरगरीब रयतेचे होते. त्यांचे एक ब्रिटिश चरित्रकार डेनिस किंकडे म्हणतात, "छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे, हिंदूचेच नव्हे, तर सर्व भारतीयांचे, जगभरातील लोकांचे प्रेरणास्थान आहे." शिवरायांनी आपल्या राज्यात कधीही भेदभाव केला नाही. त्याविषयी प्राच्यविद्यापंडित शरद पाटील म्हणतात, "शिवाजी महाराज व संभाजी महाराजांचे मोठेपण त्यांच्या समतावादी धोरणात आहे." त्यांनी जातिभेद केला नाही, तसेच स्त्री-पुरुष असा भेदभावदेखील केला नाही. महिलांना नेहमीच आदर, सन्मान आणि त्यांना संधी देण्याचे कार्य त्यांनी केले.

शिवचरित्राचे अभ्यासक लालजी पेंडसे म्हणतात, "शिवाजीराजे उपेक्षित, गोरगरीब वर्गाबाबत अत्यंत कनवाळू होते." समाजात मजूर, कष्टकरी, शेतकरी, श्रमकरी आणि विशेषतः सर्व जातिधर्मांतील महिला कायमच उपेक्षित असतात, त्यांच्याबाबत शिवाजी महाराज सहृदयी होते. छत्रपती शिवाजी महाराजां पण प्रमाणे समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्त्रीविषयी आदर भाग आदर भाव बाळगून त्यांना सन्मानाने वागवले पाहिजे. तरच स्त्री-पुरुष समानतेचा विचार खऱ्या अर्थाने भारतीय समाजात रुजेल.

**संदर्भसूची**

डॉ.जयसिंगराव पवार, डॉ. मंजुश्री पवार, मराठी सत्तेचा उदय, प्रशांत पब्लिकेशन,जळगाव, 2014, पान नं ११,१२.

1.डॉ एस. एस.गाटाळ, मराठ्यांचा इतीहास, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, 2019 ,पान नंबर १६५,१६६

2.डॉ एस. एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2013, पान नंबर 223 ते 225.

3.डॉ.जयसिंगराव पवार शिवछत्रपती एक मागोवा मेहता पब्लिकेशन हाऊस 2019 पान नंबर ४ ते ७

4.https://marathibandhav.tribe.so/post/chtrptii-shivaajii-mhaaraaj-nibndh

5.दै सकाळ ३ जुलै २०१८

6.https://maharashtratimes.com/editorial/column/time-to-time/yugpurush-chhatrapati-shivray/articleshow/68057895.cms

7.https://www.esakal.com/saptarang/shrimant-kokate-write-chhatrapati-shivaji-maharaj-article-editorial-172022